राष्ट्रपति श्रीमती द्रौपदी मुर्मु के स्वागत की तैयारियां जोरों पर
हिंदी विश्वविद्यालय में छठवें दीक्षांत समारोह का उत्साह

वर्धा, 08 अप्रैल 2026 : महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय के छठवें दीक्षांत समारोह में भारत की माननीय राष्ट्रपति श्रीमती द्रौपदी मुर्मु मुख्य अतिथि के रूप में उपस्थित रहेंगी। उनके स्वागत की तैयारियां जोरों से चल रही हैं। विश्वविद्यालय का छठवाँ दीक्षांत समारोह गुरुवार, 16 अप्रैल 2026 को पूर्वाह्न 11:25 बजे टैगोर सांस्कृतिक संकुल के निराला प्रेक्षागृह में आयोजित होने वाला है, जिसमें माननीय राष्ट्रपति एवं विश्वविद्यालय की कुलाध्यक्ष श्रीमती द्रौपदी मुर्मु मुख्य अतिथि के रूप में उपस्थित रहेंगी एवं दीक्षांत भाषण देंगी। दीक्षांत समारोह में विशिष्ट अतिथि के रूप में महाराष्ट्र के राज्यपाल श्री जिष्णु देव वर्मा, महाराष्ट्र के राजस्व मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र के शिक्षा राज्यमंत्री एवं वर्धा जिले के पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, कार्य परिषद के सदस्य प्रो. सुरेंद्र दुबे उपस्थित रहेंगे। समारोह में विश्वविद्यालय की कुलपति प्रो. कुमुद शर्मा दीक्षांत उपदेश देंगी।

विश्वविद्यालय के इतिहास में दीक्षांत समारोह के लिए पहली बार राष्ट्रपति पधार रही हैं। दीक्षांत समारोह में विद्यार्थियों को स्वर्ण पदक एवं अन्य सम्मान व पुरस्कारों से सम्मानित किया जाएगा। विश्वविद्यालय में दूसरी बार माननीय राष्ट्रपति का आगमन हो रहा है। इसके पूर्व सन 2007 में तत्कालीन राष्ट्रपति ए.पी.जे. अब्दुल कलाम आए थे। उन्होंने विश्वविद्यालय के दूर शिक्षा निदेशालय का उद्घाटन किया था। विश्वविद्यालय में राष्ट्रपति श्रीमती द्रौपदी मुर्मु के स्वागत की तैयारियां तेजी से चल रही हैं। जिला प्रशासन की ओर से सुरक्षा एवं यातायात व्यवस्था से संबंधित आवश्यक तैयारियां की जा रही हैं। विश्वविद्यालय में राष्ट्रपति मुर्मु के आगमन को लेकर खासा उत्साह दिखायी दे रहा है।

दीक्षांत समारोह के सफल आयोजन के लिए विश्वविद्यालय ने विभिन्न समितियां गठित की हैं और सभी समितियां सक्रियता से काम कर रही हैं। कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने आयोजन से संबंधित समन्वय समिति, स्वागत समिति, उपाधि एवं प्रमाणपत्र वितरण समिति, मीडिया समिति तथा यातायात व अन्य समितियों के साथ बैठक कर आयोजन के सुचारू संचालन के लिए आवश्यक दिशा-निर्देश दिए हैं।

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वागताची तयारी जोरात
हिंदी विश्वविद्यालयात सहाव्या दीक्षांत समारंभाचा उत्साह

वर्धा, ८ एप्रिल २०२६ : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभासाठी भारताच्या माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागताची तयारी जोरात सुरू आहे. विश्वविद्यालयाचा सहावा दीक्षांत समारंभ गुरुवार, १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:२५ वाजता टागोर सांस्कृतिक संकुलातील निराला प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात राष्ट्रपती तसेच विश्वविद्यालयाच्या कुलाध्यक्ष श्रीमती द्रौपदी मुर्मू प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून दीक्षांत भाषण करतील. या समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल श्री जिष्णु देव वर्मा, महाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्राचे शिक्षण राज्यमंत्री व वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर,

कार्य परिषदेचे सदस्य प्रो. सुरेंद्र दुबे विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित राहतील. कार्यक्रमात विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा दीक्षांत उपदेश देतील.

विश्वविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच दीक्षांत समारंभासाठी राष्ट्रपती येत आहेत. या प्रसंगी विद्यार्थ्यांना सुवर्णपदके तसेच इतर सन्मान व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. विश्वविद्यालयात राष्ट्रपतींचा हा दुसरा दौरा आहे. यापूर्वी २००७ साली तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी भेट देऊन दूर शिक्षा निदेशालयाचे उद्घाटन केले होते. राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी विश्वविद्यालयात जलदगतीने तयारी सुरू असून जिल्हा प्रशासनाकडून सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेची आवश्यक तयारी केली जात आहे. राष्ट्रपतींच्या आगमनामुळे विश्वविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दीक्षांत समारंभ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विश्वविद्यालयाने विविध समित्या स्थापन केल्या असून त्या सक्रियपणे कार्यरत आहेत. कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी समन्वय समिती, स्वागत समिती, पदवी व प्रमाणपत्र वितरण समिती, माध्यम समिती तसेच वाहतूक व इतर समित्यांसोबत बैठक घेऊन कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या आहेत.